# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ३९ / २०२०

नवीन कृषी वीज जोडणी बाबत

पांडुरंग महिपती पाटील ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) इस्लामपूर ..................................................... प्रतिवादी

आभासी सुनावणी तारीख :- १७ जुलै २०२०

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- विजय पांडुरंग पाटील.

प्रतिवादीतर्फे :- १) एस. बी. कारंडे, कार्यकारी अभियंता, इस्लामपूर

२) एम. बी दाडवे, उपकार्यकारी अभियंता, इस्लामपूर २ उपविभाग.

कोरम :- दिपक लाड

आदेश पारित दिनांक :- २२ जुलै २०२०

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ (यापुढे ज्याचा उल्लेख 'ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६' असा केला जाईल) मधील विनियम १७.२ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ, (यापुढे ज्याचा उल्लेख

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

'मंच' असा कला जाईल) यांच्या दिनांक ७ जानेवारी २०20 च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २४ फेब्रुवारी २०20 रोजी दाखल केलेले आहे.

२. मंचाने त्यांच्या तक्रार अर्ज क्रमांक २० (२०१९-२०) बाबत दिनांक ७ जानेवारी २०20 रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केला.

*"१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.*

*२) महावितरण कंपनीने एक महिन्यात वीज जोडणी द्यावी."*

३) अपिलार्थीने त्यांच्या निवेदनात सादर केलेले प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१) अपिलार्थीने कृषीपंपासाठी (५ अश्वशक्ती) नवीन वीज जोडणीचा विहित नमुन्यातील अर्ज योग्य कागदपत्रासह प्रतिवादी महावितरण (कुरळप शाखा) यांच्याकडे दिनांक ८ ऑगष्ट २०१८ रोजी सादर केला.

२) अर्ज करून कोटेशन मिळाले नाही म्हणून दिनांक १५ एप्रिल २०१९ रोजी सदर जोडणीबाबत प्रतिवादी, उपकार्यकारी अभियंता, महावितरण इस्लामपूर - २ शाखा यांच्याकडे तक्रार अर्ज केला.

३) प्रतिवादी यांनी कृषीपंपासाठी नवीन वीज जोडणी देता येत नसल्याने सौर उर्जे द्वारे कृषीपंपासाठी वीज जोडणी देण्याबाबत अर्ज सादर करावा असे दिनांक २ मे २०१९ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले. परंतू अपिलार्थीने त्यांस कृषीपंपासाठी पारंपारिक पध्दतीने नवीन वीज जोडणी पाहीजे असे कळविले.

४) सदर नवीन कृषीपंपासाठी योग्य ती कार्यवाही झाली नाही म्हणून अपिलार्थीने दिनांक १७ मे २०१९ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) तक्रार दाखल केली. कक्षाचा निर्णय वेळेत मिळाला नाही, सबब अपिलार्थी यांनी मंचाकडे दिनांक १४ ऑक्टोबर २०१९ रोजी तक्रार दाखल केली.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

५) मंचाने दिनांक ७ जानेवारी २०२० रोजी एक महिन्याच्या आत कृषीपंप नवीन वीज जोडणी देण्यात यावी असा आदेश पारित केला, परंतू मंचाच्या आदेशाचे वेळेत पालन न झाल्यामुळे सदरचे अभिवेदन सादर केले आहे.

६) मंचाच्या आदेशाचे पालन लवकरात लवकर करण्यात यावे, मंचाच्या आदेशाचे पालन आदेशाच्या दिनांकापासुन एक महिन्यात न झाल्यामुळे कृतीमानकानुसार नुकसान भरपाई देण्यात यावी व जबाबदार कर्मचारी व अधिकारी वर्गावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी अशी मागणी अभिवेदनात केली आहे.

४. प्रतिवादी यांनी दिनांक २९ मे २०२० च्या उत्तरात नमुद केले आहे की,

१) अपिलार्थी यांनी थ्री फेज कृषीपंपासाठी नवीन वीज जोडणीची मागणी केली. दिनांक ५ मे २०१८ चा शासन निर्णय व दिनांक २५ एप्रिल २०१८ चे महावितरणचे परीपत्रकानुसार कृषीपंपासाठी नवीन वीज जोडणी देण्याबाबत HVDS व सौर उर्जा योजना कार्यरत आहेत. सदर परीपत्रकानुसार जोडणीचा खर्च रू.२.५० लाखापेक्षा कमी असल्यास HVDS योजने अंतर्गत व खर्च रू.२.५० लाखापेक्षा जास्त असल्यास सौर उर्जा योजनेतून वीज जोडणी मिळते.

२) अपिलार्थी यांच्या कामाचे अंदाजपत्रक हे रू.२.५० लाखापेक्षा जास्त असल्याने सौर उर्जा योजनेतून वीज जोडणीस अर्ज करण्याचे अपिलार्थी यांना दिनांक २ मे २०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. परंतू अपिलार्थीने त्यास असमर्थता दर्शवुन कक्षाकडे तक्रार दाखल केली.

३) कक्षाने प्रतिवादी महावितरण कंपनीच्या HVDS योजनेमधून नवीन वीज जोडणी घेण्यासाठी अर्ज करावा व ग्राहकाने अर्ज केल्यावर नियमानूसार कार्यवाही करावी असा आदेश दिनांक ३० आक्टोबर २०१९ रोजी दिला.

४) अपिलार्थी यांनी कक्षाच्या निकालाचे पालन करून HVDS योजने अंर्तगत online अर्जावर (दिनांक १५ ऑक्टोबर २०१९ च्या) प्रतिवादी यांनी कार्यवाही करून वीज जोडणीस लागणाऱ्या कामाची पाहणी केली असता सदर ठिकाणी श्री. माणिकराव बाळासो

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

पाटील यांचे नवीन कृषीपंप वीज जोडणीचे काम प्रलंबीत आहे, त्याकरीता HT ०.५४ KM. व DTC १ x १६ केव्हीए च काम करणे आवश्यक आहे. त्यांचे काम पुर्ण झालेनंतर अपिलार्थी यांच्या वीज जोडणीच्या कामाचे अंदाजपत्रक हे रू.२.५० लाखापेक्षा कमी आल्याने अपिलार्थी यांची वीज जोडणी HVDS योजने अंर्तगत दिनांक ८ नोव्हेंबर २०१९ रोजी मंजूर करण्यात आली व अपिलार्थीस कोटेशन देण्यात आले. त्यानंतर मंचाने एक महिन्यात जोडणी दयावी असा आदेश पारीत केला.

५) शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीनुसार सद्यस्थितीत मार्च २०१८ पर्यत पैसे भरलेल्या ग्राहकांची कामे सुरू आहेत. श्री. माणिकराव बाळासो पाटील यांनी मार्च २०१८ पूर्वी पैसे भरलेले असल्याने त्यांचे काम यादोत समाविष्ठ असून ते पर्ण झाल्यानंतरच अपिलार्थी यांचे काम करण्यात येणार आहे. श्री. माणिकराव बाळासो पाटील यांचे काम मेसर्स भारत इलेक्ट्रिकल्स यांना देण्यात आलेले आहे. सदर एजन्सी काम करण्यास गेली असता शेजारील शेतकऱ्यांनी अडथळा निर्माण करून हरकत घेतली. तसेच, मार्च २०२० पासुन कोवीड-१९ चा पादर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना म्हणून राज्यात लॉक डाऊन झाल्यामुळे श्री. माणिकराव बाळासो पाटील यांचे काम प्रलंबित राहिले. सबब, अपिलार्थी यांचेही काम प्रलबित आहे.

६) मंचाने अपिलार्थीस आदेशाच्या दिनांकापासुन एक महिन्यात नवीन वीज जोडणी देण्याचे आदेश दिल, परंतू अपिलार्थी यांच्या आधी श्री माणिकराव बाळासो पाटील यांचे काम करण्यासाठी नियुक्त केलेले ठेकेदार गेले असता, शेजारील शेतकऱ्यानी हरकत घेतली. सदर अडथळा हा प्रतिवादी महावितरणच्या अख्यत्यारीच्या बाहेरील बाब आहे. वेळोवेळी शेजारील शेतकऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला पण त्यास यश आले नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) च्या अभिवेदन क्रं. २५० / २०१९ नुसार अश्या प्रकारच्या कामात ROW किंवा शेजारील शेतकऱ्यांनी अडथळा निर्माण केल्यामुळे कामास उशीर होत असल्यास त्यास प्रतिवादी महावितरणला जबाबदार धरता येणार नाही. सदर विषय महावितरणच्या कार्य कक्षेबाहेरील आहे.

७) अपिलार्थीस वीज जोडणी अर्जानुसार HVDS योजने अंर्तगत १० केव्हीए चे एक रोहीत्र मंजूर आहे. सदर ठिकाणी पायाभुत सुविधा (Infrastructure) ची आवश्यकता असल्याने

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

कृती मानके, विनियम २०१४ नुसार ग्राहकाने पैसे भरल्यानंतर काम पुर्ण करण्यास एक वर्षाचा कालावधी आहे त्यामुळे कृती मानके, विनियम २०१४ नुसार नुकसानभरपाई मिळणे हा मुद्दा चुकीचा आहे. सद्या मार्च २०१८ पर्यंत पैसे भरलेल्या ग्राहकांची कामे उपलब्ध निधीतून करण्यात येत आहेत. मंचाचे आदेशाची परिपुर्तता करण्यासाठी प्रतिवादी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी मनापासून प्रयत्न करत आहेत. त्यासाठी काम पुर्ण करण्यासाठी ठकेदाराची नेमणूक करण्यात आली, अडथळा निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यांची समजुत काढण्यात येत आहे पण त्यात यश येत नाही त्यामुळे सबधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी हा मुद्दा या ठिकाणी गैरलागू आहे.

५. सदर अभिवेदनाची आभासी सुनावणी दिनांक १७ जुलै २020 रोजी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षांनी तोंडी युक्तिवाद केला व आपल्या लेखी निवेदनातील मुद्दे पुनश्चः मांडले. अपिलार्थीने सुनावणी दरम्यान नवीन कृषीपंप वीज जोडणी लवकरात लवकर देण्यात यावी अशी मागणी केली.

६. **विश्लेषण व निर्णय**

दोन्ही पक्षकारांचे म्हणने एकण्यात आले व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. कृषीपंपासाठी नवीन वीज जोडणीचा सवार्थाने परिपुर्ण अर्ज सादर केलेल्या दिनांकापासून विशिष्ट मुदतीत वीज जोडणी मिळण्याचा ग्राहकास कायदेशीर हक्क आहे व वीज जोडणी देण्यासाठी झालेल्या विलंबाकरीता कृती मानके, विनियम २०१४ नुसार व महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने त्यांच्या या संदर्भात अभिवेदन क्र.६/२०१९ बाबत दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशाच्या अनुषंगाने, निर्णय दिलेला आहे.

नवीन कृषीपंपासाठी वीज जोडणी देण्यासंदर्भात प्रतिवादी महावितरणकडुन काही योजना व निकष तयार केले आहेत. मंचाने नवीन वीज जोडणीबाबत सदर गाऱ्हाण्यात निर्णय दिलेला आहे.

प्रतिवादी महावितरणच्या अधिकाऱ्याने कृषीपंप वीज जोडणी लवकरात लवकर देतो असे आश्वासित केल्यावर अपिलार्थी यांनी कृतीमानकानुसार नुकसान भरपाई मिळावी ही मागणी मंचापुढे

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

रद्द केली, परंतू मंचाच्या आदेशानतर सुध्दा जर एक महिन्यात वीज जोडणी झाली नाही, तर मात्र, नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केलेली आहे.

अपिलार्थींनी मंचाकडे सादर केलेल्या मागणीनुसारच मंचाचा निर्णय आहे. सबब, त्या विरूध्द विद्युत लोकपाल यांच्याकडे सदरचे अभिवेदन दाखल करण्याचे काहीही प्रयोजन नव्हते. किंबहुना मंचाच्या आदेशाचे प्रतिवादीनी पालन न केल्यामुळे अपिलार्थीने विद्युत अधिनियम २००३ नुसार आयोगाकडे जाणे अपेक्षित आहे व या संदर्भात आदेश पारित करण्याचे विद्युत लोकपालांच्या कक्षे बाहेर आहे.

सबब, वरील बाबींचा विचार करीता मी, खालील आदेश पारीत करीत आहे.

१) अपिलार्थींची ईच्छा असल्यास, मंचाच्या आदेशाविरूध्द, अपिलार्थी योग्य त्या व्यासपिठाकडे दाद मागू शकतात.

२) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने त्यांच्या या संदर्भात अभिवेदन क्र.६/२०१९ बाबत दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशाच्या अनुषंगाने, निर्णय दिलेला आहे. प्रतिवादींनी या निर्णयाच्या अधीन राहून योग्य ती भरपाई वीज जोडणी दिल्यानंतरच देण्यात यावी.

३) अपिलार्थींच्या इतर मागण्या फेटाळण्यात येत आहेत.

४) सदरचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

कोवीड-२०१९ च्या अनुषंगाने उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे सदरच्या आदेशाला विलंब झाला आहे.

सही/-
(दिपक लाड)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai